पदमपुरा येथे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

पदमपुरा येथे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली.

यावेळी गुरु रविदास महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संत रविदास महाराजांनी समता, बंधुता, मानवता व सामाजिक न्यायाचा संदेश दिला. त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी गुरु रविदास महाराजांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन केले.

शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर आंबेडकर मैदानात साजरी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर आंबेडकर मैदानात साजरी करण्यात आली. संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या प्रतिमेस मेणबत्ती अगरबत्ती प्रज्वलित करून पुष्पहार पँथर नेते लक्ष्मण भुतकर यांनी अर्पण करून अभिवादन केले तर जगदीश बिरसने यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना पुष्पहार घालुन अभिवादन केले यावेळी लक्ष्मण भुतकर संत रविदास महाराजांचे जीवनावर प्रकाश टाकला व त्यांनी दिल्या शिकवणीप्रमाणे वागण्याची आव्हान केले यावेळी लक्ष्मण भुतकर किसन भिवसने समाधान कस्तुरे किसन नरवडे दशरथ कांबळे जगदीश बिरसने राजू भगुरे अशोक भगुरे बन्सी तरटे राजू डोंगरे लक्ष्मण गरोठे ताराचंद भगुरे पगारे मामा शिवलाल लसगरे सह मोठे संख्येने कार्यकर्ते सहभागी आहे

ईश्वर पुसे व समाज बांधवांकडून रविदास महाराजांची जयंती साजरी

टि.व्ही.सेंटर येथे संत रविदास महाराज मंदिर येथे ईश्वर पुसे व समाज बांधवांकडून संत रविदास महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

भगवान रविदास महाराज मंदिर येथे गुरु रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

'सत संगत मिल रहियो माथो, जैसे मधुप मखीरा' या विचारांची अनुभूती देणाऱ्या जगतगुरू संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त आज रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी भगवान रविदास महाराज मंदिर, हडको, टी.व्ही. सेंटर, संजय गांधी मार्केट परिसरात जयंती सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६.३० वाजता अमृतवाणी पाठाने करण्यात आली. सकाळी ७.३० वाजता आरती व अरदास पार पडली. ही आरती-अरदास श्री. अनिल निंभोरे व श्री. बालाजी सोनटक्के यांच्या हस्ते संपन्न झाली. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता निशान साहिब समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दुपारी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत सर्व भाविकांसाठी महाप्रसाद (लंगर)चे आयोजन करण्यात आले होते. या लंगर महाप्रसाद सेवेचे आयोजन जीवन रामचंद्र दुर्वे यांच्या वतीने करण्यात आले.

या प्रसंगी गुरु रविदास म हाराजांनी दिलेला समता, बंधुता, मानवता व सामाजिक न्यायाचा संदेश उपस्थितांना मार्गदर्शक ठरतो, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

हा कार्यक्रम विश्वस्त भगवान रविदास चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे अध्यक्ष श्री. भारत परमेश्वरी, उपाध्यक्ष श्री. रमेश पहारे, सचिव श्री. सुभाष धनतोले, कोषाध्यक्ष श्री. रामु फुलमाळी तसेच सदस्य सौ. जयमाला दुर्वे, सौ. संगिता उंबरे, श्री. नंदकुमार दुर्वे, श्री. राजु परमेश्वरी, श्री. अनिल निंभोरे, श्री. उध्दव खराते, श्रीमती मीना डोंगरे, श्री. संतोष पहारे, प्रविण बोर्डे रविश्री किशोर कुचे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रम शांततेत व भक्तिभावाने पार पडला असून भाविकांनी गुरु रविदास महाराजांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प यावेळी केला.

भास्कर लहाने व समाज बांधवांकडून रविदास महाराजांची जयंती साजरी

विठ्ठलनगर, एन-२ सिडको येथे संत रविदास महाराज मंदिर येथे भास्कर लहाने व समाज बांधवांकडून संत रविदास महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. (छाया : दिनेश परदेशी)

छत्रपती संभाजीनगरात संत शिरोमणी गुरु रविदास महाराजांची ६४९ वी जयंती उत्साहात साजरी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

संत शिरोमणी गुरु रविदास केंद्रीय जयंती महोत्सव समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्यातर्फे संत शिरोमणी गुरु रविदास म हाराजांची ६४९ वी जयंती शहरातील क्रांती चौक येथे मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने आयोजित भव्य शोभायात्रेची सुरुवात क्रांती चौकातून करण्यात आली. ही शोभायात्रा पैठण गेट मार्गे औरंगपुरा येथे पोहोचून महात्मा फुले पुतळा येथे समारोप करण्यात आला. शोभायात्रेचे उद्घाटन विधान परिषदेचे आमदार संजय केणेकर व बदनापूरचे आमदार नारायण कुचे यांच्या हस्ते झाले. शोभायात्रेत संत गुरु रविदास महाराजांच्या प्रतिमेची आकर्षक सजावट करण्यात आली होती. ढोल-ताशांच्या गजरात, भजन-कीर्तन व संतवाणीच्या घोषणांसह संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. 'मन चंगा तो कठौती में गंगा' या विचारांचा जयघोष सर्वत्र करण्यात येत होता.

या कार्यक्रमास नगरसेवक नंदलाल गवळी, केंद्रीय उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गोरे, कार्याध्यक्ष सुभाष बोरोदे, कोषाध्यक्ष सुरेश गवळी, महिला अध्यक्ष आशाताई बरसावणे, हरिदास पुसे (गायक), संजय जाटवे, प्रभू कटारे, चेतन डोंगरे, प्रसिद्धी प्रमुख प्रवीण बोरुडे यांच्यासह समाजातील मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी संत गुरु रविदास महाराजांच्या समता, बंधुता, मानवता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रम शांततेत व उत्साहात पार पडला.

शोभायात्रेचे उद्घाटन विधान परिषदेचे आमदार संजय केणेकर व बदनापूरचे आमदार नारायण कुचे यांच्या हस्ते झाले.

आयएमए हेल्दी सिटी मॅरेथॉन उत्साहात ४५० हून अधिक धावपटूंचा सहभाग, 'आरोग्य सर्वांसाठी'चा प्रभावी संदेश

छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)

IMA छत्रपती संभाजीनगरतर्फे आयोजित पहिलीच "IMA हेल्दी सिटी मॅरेथॉन २०२६' रविवारी सकाळी उत्साहात पार पडली. आरोग्य, तंदुरुस्ती आणि प्रतिबंधात्मक वैद्यकशास्त्राचा ठोस संदेश देणाऱ्या या उपक्रमाला समाजातील विविध घटकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. डॉ. अनुपम टाकळकर यांच्या संकल्पनेतून तसेच डॉ. शिवाजी पोले , डॉ. योगेश लक्कास, डॉ. आसावरी टाकळकर आणि डॉ. गितेश दलवी यांच्या अथक प्रयत्नांतून हा उपक्रम साकार झाला. ४५० हून अधिक धावपटूंनी या मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला. डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी, सामान्य नागरिक तसेच लहान मुलांनीही उत्स्फूर्तपणे धाव घेतली. डॉक्टर आणि नागरिकांनी खांद्याला खांदा लावून धावत 'आरोग्य सर्वांसाठी' हा संदेश प्रभावीपणे दिला.

कार्यक्रमाची सुरुवात उत्साहवर्धक प्री वर्कआउट सत्राने झाली. मॅरेथॉनचा प्रारंभ व समारोप IMA हॉल, छत्रपती संभाजीनगर येथून झाला. या उपक्रमाला दहा पेक्षा अधिक नामवंत ब्रँड ॲम्बेसेडर्सनी पाठिंबा दिला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे हे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. अशा उपक्रमांमुळे समाजात प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित होते. डॉक्टर आणि नागरिकांनी एकत्र येऊन आरोग्यासाठी धावणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

हा उपक्रम आय एम ए तर्फे पार पडला. अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर,

सचिव डॉ. योगेश लक्कास, कोषाध्यक्ष व आयोजन अध्यक्ष डॉ. शिवाजी पोळे, बीपीसीसी डॉ. यशवंत गाडे, माजी अध्यक्ष डॉ. दत्ता कदम, डॉ. आसावरी टाकळकर, डॉ. अंजली गाडे तसेच संयुक्त सचिव डॉ. गितेश दलवी (क्रीडा) व डॉ. संभाजी चिंतळे यांनी विशेष परिश्रम घेतले. IMA अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी सांगितले की, IMA ची पहिली मॅरेथॉन म्हणजे आरोग्याबाबत वाढत असलेल्या सामाजिक जाणिवेचे प्रतीक आहे. डॉक्टर आणि नागरिकांनी एकत्र धावणे हीच या उपक्रमाची खरी ताकद आहे. सचिव डॉ. योगेश लक्कास यांनी ही मॅरेथॉन केवळ धावण्याची स्पर्धा नसून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेची चळवळ असल्याचे स्पष्ट केले.

कोषाध्यक्ष व आयोजन सचिव डॉ. शिवाजी पोले यांनी मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद संपूर्ण टीम साठी प्रेरणादायी ठरल्याचे सांगितले.

विविध गटांतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. सर्व सहभागी धावपटूंना IMA तर्फे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरळीत व सुरक्षित आयोजनासाठी पोलीस विभागाने दिलेल्या सहकार्याबद्दल खचअ छत्रपती संभाजीनगरतर्फे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

माजी अध्यक्ष डॉ उज्वला दहिफळे, माजी अध्यक्ष डॉ यशवंत गाडे, डॉ अंजली गाडे, डॉ अमोल कुलकर्णी, डॉ दत्ता कदम, डॉ जितेन कुलकर्णी, डॉ प्रशांत परगावकर, डॉ श्रीगणेश बर्नेला, डॉ राघवेंद्र चाकूरकर आदी डॉक्टर वृंदासह ४५० मॅरेथॉन रनर ने सहभाग नोंदवला. IMA हेल्दी सिटी मॅरेथॉन २०२६ हा उपक्रम आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देत शहरासाठी अभिमानास्पद ठरला.

सिंघम... अतुल येरमे जनसामान्यात मिसळणारा पोलीस निरीक्षक

खरं तर पोलिसांविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात भीती नसून आदर असायला हवा, आणि गुंड, टवाळखोर व समाजकंटकांच्या मनात मात्र पोलिसांचा धाक असला पाहिजे. हीच खरी, सक्षम आणि लोकाभिमुख पोलीस व्यवस्था होय. या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरवणारे आगळे-वेगळे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक अतुल येरमे.

आज 'पोलीस निरीक्षक' म्हटले की अनेकांच्या मनात कडक शिस्त, रुबाब, अहंकार आणि दुरावा अशी प्रतिमा उभी राहते. अनेकदा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलेला नागरिकच आरोपी असल्यासारखा वागवला जातो. त्याचे म्हणणे नीट ऐकून न घेता उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. परिणामी पोलिसांविषयी भीती, गैरसमज आणि नाराजी निर्माण होते. मात्र पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांच्या बाबतीत हे चित्र पूर्णपणे वेगळे आणि आशादायी आहे.

अतुल येरमे हे यापूर्वी उस्मानपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत होते. तेथेही त्यांनी आपल्या कामाची छाप सोडत नागरिकांचा विश्वास संपादन केला होता. सध्या सिडको पोलीस ठाण्यात कार्यरत असताना ते केवळ अधिकारी म्हणून नव्हे, तर जनसामान्यांचा आवाज म्हणून ओळखले जात आहेत. ते लोकांमध्ये मिसळतात, चहा टपरीवर सामान्य नागरिकांसोबत चहा घेतात, चारचौघात सहज संवाद साधतात. त्यांच्या वागण्या-बोलण्यात कुठलाही पदाचा गर्व दिसत नाही.

कोणतीही तक्रार आली तर ती शांतपणे, गांभीर्याने ऐकून घेतली जाते. ङ्गकाहीही अडचण असली तर अतुल सर लगेच निर्णय घेतात, असे नागरिक आत्मविश्वासाने सांगतात. अन्याय झाल्यास तात्काळ शहानिशा करून गुन्हा दाखल केला जातो. कोणताही दबाव, राजकारण किंवा भीती न ठेवता कायद्याच्या चौकटीत राहून कारवाई केली जाते. सर्व जाती-धर्मातील नागरिकांना समान वागणूक देणे, ही त्यांची ठाम भूमिका आहे.

अलीकडेच कॅनॉट प्लेस गार्डन परिसरात टवाळखोरांविरोधात त्यांनी केलेली धडाडीची कारवाई चर्चेचा विषय ठरली. या कारवाईमुळे समाजकंटकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, ते होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण सामान्य नागरिकांनी निर्भयपणे जगले पाहिजे आणि कायदा मोडणाऱ्यांनी पोलिसांचा धाक मनात ठेवला पाहिजेही भूमिका अतुल येरमे ठामपणे अमलात आणताना दिसतात.

सिडको पोलीस ठाण्यात अल्पावधीतच अतुल येरमे यांनी आपली ठळक ओळख निर्माण केली आहे. कोणताही नागरिक काम घेऊन आला तरी त्याचे समाधान करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जातो. त्यामुळे पोलीस ठाण्याबाबत नागरिकांमध्ये विश्वास, सुरक्षितता आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घमेंड नसलेला, जनतेत मिसळणारा, निर्णयक्षम आणि धडाडीचा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक अतुल येरमे आज सिडको पोलीस ठाण्याची ओळख बनले आहेत. अशा अधिकाऱ्यांमुळेच पोलिसांविषयी भीती नव्हे तर आदर निर्माण होतो, आणि हाच खऱ्या अर्थाने लोकाभिमुख पोलीस व्यवस्थेचा मजबूत पाया आहे.

– रतनकुमार साळवे
अध्यक्ष, एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशन

औरंगाबाद जिल्हा लोहार गाडीलोहार समाज विकास संघटना स्वातंत्र्य दिन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)

औरंगाबाद जिल्हा लोहार गाडीलोहार समाज विकास संघटना संचलित भटक्या विमुक्त जाती जमाती इतर मागासवर्गीय वसतिगृह, शुभश्री कॉलनी एन ६, सिडको, छत्रपती संभाजीनगर स्वातंत्र्य दिन व भारत माता पूजन उत्साहात संपन्न प्रमुख वक्ते मा.श्री. विजयराव लेकुरवाळे (संघचालक रा.स्व.सनघ चिकलठाणा जिल्हा यांनी भारतीय जीवन कुटुंब पद्धती अनेक आक्रमणात होऊन देखील जिवंत राहिली कुटुंब सक्षम तर समाज सक्षम आणि समाज सक्षम गाव सक्षम आणि गाव सक्षम राज्य व देश सक्षम उद्गागार त्यांनी काढले, सामाजिक समरसता अंगीकारली पाहिजे सर्व सभा बांधव आपलेच आहे यात कोणताही भेद करू नये असेही त्यांनी सांगितले.

पर्यावरणाचा देखील त्यांनी आपले विचार मांडून आपले आरोग्य सांभाळू या असे त्यांनी प्रतिपादन केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री रामदास ठोंबरे यात त्यांनी जननी जन्मभूमी स्वर्ग से महान है एस के वास्ते तन है मन है और प्राण आहे. असे गौरव गार काढलेत याप्रसंगी औरंगाबाद जिल्हा लोहार गाडीलोहार समाज विकास संघटनेचे श्री. प्रदीपजी वाघ, श्री सुभाष थोरात श्री आनंद वैद्य श्री कचरू पोपळघट श्री. विष्णुजी पोपळघट, पोपळघट, श्रीमती सुनीताजी पवार श्री.रमेशजी पोपळघट परिसरातील असंख्य मंडळी व वसतिगृहातील बालगोपाल मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाला रविजी वैद्य, अमोल मांडुळकर यांनी विषेश मेहनत घेतली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही
(यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199